सातारा सैनिकी शाळेला सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकीय तूटीच्या पूर्ततेसाठी निधी मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः सासैशा-२०१८/प्र.क्र. ५६ /एसएम-६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ३२
तारीख: २८ मार्च, २०१८

<u>वाचा</u> :-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७
२) शासन परिपत्रक क्रमांकः पूरक २०१६/प्र.क्र.९९/ अर्थसंकल्प-३, वित्त विभाग, दिनांक ३०.६.२०१७
३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचे क्र. सासैशा-२०१६- १७/ शिष्यवृत्ती/माध्य-३०३/४७९५, दिनांक १.९.२०१७
४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचे क्र. सासैशा-२०१७- १८/टे-३०३/११०४, दिनांक २०.२.२०१८
५) शासन निर्णय क्रमांक अनुवि-४९१७/प्र.क्र. ३२/अर्थसंकल्प, शालेय शिक्षण विभाग, दिनांक २१.०२.२०१८

<u>प्रस्तावना</u> :-

सन १९६१ साली सातारा सैनिकी शाळेची स्थापना भारत सरकारने केलेली आहे. या सैनिकी शाळेची निर्मिती करताना नियमावली करण्यात आली आहे. या नियमावलीमध्ये शाळेमध्ये द्यावयाची प्रवेश पध्दती, शाळेचे प्रशासन व राज्य सरकारचे दायित्व इ. बाबत तरतूदी केलेल्या आहेत. या नियमाच्या अनुषंगाने शाळेचे एकूण कामकाज लोकल बोर्ड ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन या समितीने मान्य केलेल्या प्रस्तावानुसार चालते. लोकल बोर्ड ऑफ ॲडमिनिस्ट्रेशनने ज्या खर्चास मान्यता दिली असेल त्या खर्चाची प्रतिपूर्ती करताना जी तूट येईल ती तूट राज्य शासनाने भरुन द्यावी, अशी तरतूद सैनिक स्कूल ऑफ सोसायटी नियमावलीत केली आहे. आर्थिक तरतूदीपेक्षा जास्त होणारा खर्च तूटीचा अंदाजपत्रक म्हणून सादर केल्यानंतर त्यास शासनाकडून मान्यता देण्यात येते. दिनांक ३०.१२.२०१६ रोजी सातारा सैनिकी स्कूल, केंद्र शासन व राज्य शासन यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार सातारा सैनिकी शाळेची अंदाजपत्रकीय तूट भरुन देण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे.

२. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता आलेली अंदाजपत्रकीय तूट भरुन काढण्यासाठी सातारा सैनिक शाळेस रु.२,१३,१४,७१०/- (रुपये दोन कोटी तेरा लाख चौदा हजार सातशे दहा फक्त) इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी “मागणी क्रमांक ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण-११०, अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्य (००) (०३) पूर्वाध्ययन सैनिकी शाळांना सहायक अनुदान (२२०२०४६९), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशिर्षाखाली रु.६८३४८.००० हजार इतकी अर्थसंकल्पीय तरतूद असून त्यापैकी ५९७१३.२०० हजार इतका निधी वितरीत केला आहे. उपलब्ध तरतूदीतून सातारा सैनिक शाळेस सन २०१६-१७ या वर्षाकरिता आलेली अंदाजपत्रकीय तूट भरुन काढण्यासाठी रु.२,१३,१४,७१०/- (रुपये दोन कोटी तेरा लाख चौदा हजार सातशे दहा फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर खर्च "मागणी क्रमांक ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण-११०, अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्य (००) (०३) पूर्वाध्ययन सैनिकी शाळांना सहायक अनुदान (२२०२०४६९), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) " या लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

३. सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून तसेच सहायक संचालक (लेखा) माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर रक्कम प्रत्यक्षात वितरीत करण्यापूर्वी सातारा सैनिकी शाळा यांचेकडील अभिलेख लेखाशाखेमार्फत तपासून वित्तीय तूटीच्या रकमेबाबत खातरजमा करण्यात यावी व तद्नंतर सदर रक्कम वितरीत करुन प्रतिपूर्ती अहवाल एक महिन्याच्या आत शासनास सादर करावा.

४. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शक सूचनांचे, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७ व क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक ३०.६.२०१७ च्या परिपत्रकातील आदेशांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

५. सदर आदेश वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. (२) येथील शासन परिपत्रक, दिनांक ३०.६.२०१७ अन्वये व शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक २१.२.२०१८ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२८१९५७५१०७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sangita Dinesh Shelke

Digitally signed by Sangita Dinesh Shelke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9ace0ca0b129ab4da8f9e911057d75e7fbf6f6bd0b55e8ff7ca0deacfa15e1c0, cn=Sangita Dinesh Shelke
Date: 2018.03.28 20:01:44 +05'30'

(संगिता दि. शेळके)
कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
२. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण)मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
३. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
५. सहायक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे
६. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सातारा.
७. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
८. प्रधान महालेखापाल(लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
१०. वरीष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
११. प्राचार्य, सैनिकी स्कूल, सातारा
१२. सचिव, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
१३. मानद सचिव, बोर्ड ऑफ गव्हर्नस सैनिकी स्कूल, नवी दिल्ली.
१४. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. वित्त विभाग,व्यय-५/अर्थसंकल्प-३ मंत्रालय,मुंबई-३२ /निवड नस्ती (एसएम-६)